क्रमांक : १६७२१ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २ नोव्हेंबर, २०२१.

**संदर्भ :- १)** या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ११०९१/क-१, दिनांक १९ जुलै, २०२१.
२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ११३०७/क-१, दिनांक २६ जुलै, २०२१.
३) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. संकीर्ण-३५२१/प्र.क्र.१६४/१९अ, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१.

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, राज्यातील कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य शासनाद्वारे वेळोवेळी लसीकरण कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्यानुषंगाने विधानमंडळ सचिवालयातही दिनांक २१, २८ मे, २५ जून, ६ सप्टेंबर, व ६ ऑक्टोबर, २०२१ रोजी लसीकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे निदेशानुसार या सचिवालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी विधानमंडळ सचिवालय तसेच अन्य शासकीय / खाजगी रुग्णालयात घेतलेल्या लसीकरणाच्या माहितीचे एकत्रित संकलन करण्यासाठी यापूर्वी ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी माहिती अपलोड केली नाही व ज्यांनी २८ जुलै, २०२१ नंतर नव्याने लसीकरणाचे डोस घेतले आहेत अशा सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी मंगळवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या सचिवालयाच्या http://mls.org.in/covid-report/index.html या संकेतस्थळावर गुगल फॉर्ममध्ये संवर्गनिहाय माहिती भरुन देणे तसेच लसीकरणाचे प्रमाणपत्र अपलोड करणे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी बंधनकारक राहील.**

आदेशानुसार,
(स्वाक्षरी)
**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद / महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.

११) क-२ (संगणक) कक्ष.

१२) सर्व विधीमंडळ पक्ष कार्यालय.

१३) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१४) निवडनस्ती.

**प्रतिलिपी :-**

१) उप अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

२) शाखा अभियंता (स्थापत्य), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.